दि.14 फेब्रुवारी2014

# <u>संसदेत झालेल्या हंगाम्यामुळे कॉंग्रेसच्या अक्षमतेची पोल खुलली.</u>

**अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

आम्ही खुप आधीपासून सांगत आलो आहोत की, युपिएची शासन करण्याची इच्छा संपली आहे. राजकीय निर्णय घेणे आणि निर्णयांना लागू करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर प्रश्नं निर्माण होऊ लागली आहेत. आज जे की घडले ते तेलंगणा राज्याच्या प्रस्तावावरुन निर्माण राजकीय स्थितीशी निपटण्यासाठी युपिएच्या अक्षमतेला दाखवते. कॉंग्रेस पक्ष स्वतः वाटलेली आहे. मुख्यतः आंध्र प्रदेशातून त्यांचे खासदार संसदेचे कामकाज चालू न देण्यासाठी जबाबदार आहेत. त्याच्या मुख्यमंत्र्यांनी राज्यात प्रशासन पूर्णपणे ठप्प करणे सुनिश्चित केले आहे.

लोकसभेत आजची घटना भारताच्या संसदीय लोकतंत्रावर गंभीर प्रहार आहे. आज जी घटना घडली आहे त्याच्याने भारताच्या लोकतंत्राची कमजोरी समोर आली आहे आणि त्याचबरोबर लोकतंत्राची बदनामी झाली आहे. संसदेच्या कारवाईत बाधा पोचवण्यासाठी खतरनाक आणि वर्ज असलेल्या गोष्टींचा उपयोग करण्यात आला. सदस्य समजू पण शकले नाहीत की खरे काय घडले. याच्या उलट तेलंगणा आणि सीमांध्र सहित भाजपाचे सर्व सदस्य तेलंगणा राज्याच्या स्थापनेच्या समर्थनार्थ समन्वित धोरण स्वीकारत आहेत आणि सीमांध्रच्या लोकांच्या समस्या पण दूर करत आहोत. दुःखाची बाब अशी की युपिए या दीशेने पूर्णपणे विफल ठरला आहे. वर्तमान संकट याच विफलतेच्या कारणास्तव आले. स्थितीकडे हलगर्जीपणा केल्याची सर्व जबाबदारी कॉंग्रेस आणि एकट्या कॉंग्रेसनेच घेतली पाहिजे. सरकारला जे होमवर्क केले पाहिजे होते तिने केले नाही. जर तिने पूरेसा होमवर्क केला असता तर स्थिती उद्भवली नसती.